Literacy for a Billion

Movie: Sundar Majhe Ghar
Year: 2009

Song: Guj Mayeche Anokhe
Lyricist:

गुज मायेचे अनोखे
चार भिंती सांगती
अन् सुखाच्या दिपमाला
उंबऱ्याशी तेवती

अंतरीच्या स्पंदनांची
घेत असे चाहूल हे
बांधते रेशीमगाठी
नांदते घरकुल हे

साजिऱ्या माझ्या घराला
चंदनाचा स्पर्श आहे
ह्या घराच्या आसमंती

दाटलेला हर्ष आहे
माऊलीची कूस हळवी
हासरे गोकुळ हे
बांधते रेशीमगाठी
नांदते घरकुल हे

सोनपंखी आठवांची
पाखरे बोलावती
ऐकू येई साद हलकी
पापण्या ओलावती
एकट्या माझ्या जीवाला
लावते हुरहूर हे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*